# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.

## जाहिरात

क्रमांक/जाहिरात/वनामकृवि-१/२०१७. दिनांक.२२/५/२०१७.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,परभणी अंतर्गत गट-ब संवर्गातील पदे सरळसेवेने भरण्याकरीता विहीत अर्हता धारण करणा-या उमेदवारांकडून दिनांक.३०/६/२०१७ पर्यत लेखी परिक्षेकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्यापुर्वी संपूर्ण जाहिरात व दिलेल्या सूचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

प्रस्तुत जाहिरातीत नमुद केलेल्या अटीची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून अर्ज मागविण्याकरीता भरावयाच्या उपलब्ध पदांचा तपशील व आरक्षण खालीलप्रमाणे दिलेले आहे.

**१) वरिष्ठ संशोधन सहाय्यक (कृषि शाखा) गट-ब (रु.९३००-३४८००/- ग्रेड वेतन रु.४४००/-)**

| प्रवर्गनिहाय पदे | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
| १) सर्वसाधारण | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | ६ | १० |
| २)महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ३ |
| ३) अपंग ३% | उपरोक्त पदांमध्ये कर्णबधीर-०१ अंपग आरक्षण समाविष्ठ आहे. | | | | | | | | | |
| एकुण | १ | ० | ० | १ | १ | ० | ० | २ | ८ | १३ |

**२) वरिष्ठ संशोधन सहाय्यक (अन्नतंत्र शाखा) गट-ब (रु.९३००-३४८००/- ग्रेड वेतन रु.४४००/-)**

| प्रवर्गनिहाय पदे | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | विजा.अ | भ.ज.ब | भ.ज.क | भ.ज.ड | विमाप्र | इमाव | खुला | एकुण |
| १) सर्वसाधारण | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |
| २)महिला ३०% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३) अपंग ३% | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ३ |

उपरोक्त नमुद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार विद्यापीठाकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

महिलांचे आरक्षण हे त्या-त्या प्रवर्गासाठी समांतर आरक्षण राहील. तथापी त्या-त्या प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध झाल्या नाहीत तर सदर आरक्षण इतरत्र आदलाबदल न करता त्या-त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारातून भरण्यात येईल.

अपंगासाठी आरक्षीत पदे जाहिरातीस दिलेल्या पदामध्ये समाविष्ट असल्यामुळे अपंगाकरीता आरक्षीत पदामधून गुणानुक्रमे व गुणवत्तेनुसार ज्या जात प्रवर्गातून उमेदवार निवड करण्यास पात्र होतील त्या जात प्रवर्गातील सर्वसाधारण कोटयातील पद भरण्यात येणार नाही.

**शैक्षणिक पात्रता :-**

खालील प्रमाणे शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारानी अर्ज सादर करावेत.

| अ.क्र. | पदाचे नाव व वेतनश्रेणी | शैक्षणिक पात्रता व अनुभव |
|---|---|---|
| १. | वरिष्ठ संशोधन सहायक (कृषि शाखा) रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४४००/ | मान्यता प्राप्त कृषि विद्यापीठातील कृषि शाखेतील संबंधीत (एम.एस्सी.-कृषि, एम.एस्सी.-उद्यानविद्या) विषयाची पदव्युत्तर पदवी उतीर्ण. |
| २. | वरिष्ठ संशोधन सहाय्यक (अन्नंतत्र शाखा) रु.९३००-३४८०० ग्रेड वेतन रु.४४००/ | मान्यता प्राप्त कृषि विद्यापीठातील अन्नतंत्र शाखेतील संबधीत विषयाची पदव्युत्तर पदवी उतीर्ण. |

**टिपः-** शासन साप्रवि निर्णय दिनांक.१०.१२.१९९८ नुसार मुक्त विद्यापीठ कृषि व संबधीत विद्याशाखेतील पदवीधारकांनी वरिल पदांसाठी केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

**वयोमर्यादा :-**

१. अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास म्हणजे दि.३०/६/२०१७ रोजी खुल्या प्रवर्गातील उमेदवाराचे किमान वय वर्षे १८ पेक्षा कमी व ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच मागासवर्गीय उमेदवारांकरीता कमाल वयोमर्यादा ५ वर्षांनी शिथीलक्षम म्हणजे ४३ वर्षे राहील.(शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०१५/प्र.क्र. ४०४/ कार्या.१२, दिनांक : २५/०४/२०१६ )

२. अपंग उमेदवारांसाठी उच्चतम वयोमर्यादा ४५ वर्ष राहील (शासन सा.प्र.वि.परिपत्रक क्रं.न्या.व्र.१००३/९९/ प्र.क्रं.२/०३(भाग-२)/१६-अे,दिनांक.२५.१०.२००५ रोजीचे सहपत्र-९ व शासन परिपत्रक दि.४.८.२०११)

३. कार्यकारी परिषद ठराव का.प.क्रं.२४,दि.५.५.२०१७ रोजीच्या अनुषंगाने सेवांतर्गत उमेदवारांसाठीची कमाल वयोमर्यादा खालील प्रमाणे विहीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वर्गवारी | कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १. | या विद्यापीठात तसेच महाराष्ट्रातील इतर कृषि विद्यापीठामध्ये नियमीत आस्थापनेवर, वेतनश्रेणीत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांकरीता व राज्य शासन /केंद्र शासन / निमशासकिय संस्था /शासन अनुदानीत शैक्षणिक संस्थामध्ये नियमित आस्थापनेवर व वेतनश्रेणीत कार्यरत कर्मचाऱ्यांकरीता सरसगट कमाल वयोमर्यादा. (विहीत नमुन्यातील म्हणजे अर्जातील नियोक्त्याचे ना-हरकत व अनुभव प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक) | ५० वर्षे |

**लेखी परीक्षेचे स्वरूप :-**

१. शासन निर्णय क्रमांक प्रानिम-२००७/प्र.क्र.४६/७/१३-अ, दिनांक१९.१०.२००७ तसेच प्रानिम-१२१४/ प्र.क्र.४३/१४/१३-अ,दिनांक ५.६.२०१४ तसेच ५.१०.२०१५ मधील प्रावधानानुसार वरील पदासाठी लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांनी लेखी परिक्षेत प्राप्त गुणांच्या आधारे गुणानुक्रमे पर्याप्त संख्येत कागदपत्रे पडताळणी करीता बोलविण्यात येईल.

२. शासन निर्णय क्रमांक प्रानिम-२००७/प्र.क्र.४६/७/१३-अ दिनांक २७.६.२००८ अन्वये गुणवत्ता यादीत अंर्तभाव होण्यासाठी लेखी परिक्षेत किमान ४५ टक्के गुण मिळविणे आवश्यक राहील.

३. शासन निर्णय दिनांक.१९.६.२०१० नुसार लेखी परिक्षेकरीता काळया शाईचा बॉलपेनचा वापर करणे बंधनकारक राहील.

८. शासन निर्णय क्र.प्रानिम-१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ, दि.५.६.२०१४ रोजीचे अनुषंगाने व विद्यापीठ कार्यकारी परिषद ठराव क्रमांक का.प.२४, दि.०५ /०५/२०१७ मधील निर्देशानुसार परिक्षेचे स्वरुप खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | विषय | माध्यम | एकुण गुण | परीक्षेचा कालावधी | प्रश्न पत्रीकेचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| १. | मराठी | मराठी | २० | (२ तास ) | वस्तूनिष्ठ व बहुपर्यायी प्रश्न. प्रत्येक प्रश्नास २ गुण. |
| २. | इंग्रजी | इंग्रजी | २० | | |
| ३. | अंकगणित व बुध्दीमापन चाचणी | मराठी | २० | | |
| ४. | सामान्य ज्ञान | मराठी | २० | | |
| ५. | संबंधित विद्या शाखेतील विषय ज्ञान | इंग्रजी | १२० | | |
| | | एकुण | २०० | | |

अर्ज कसा करावा:-

जाहिरातीतील सविस्तर माहिती, सर्वसाधारण अटी/ सुचना, निवडीची पध्दत संबंधित शासन निर्णय इत्यादी बाबतचा तपशिल वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या संकेतस्थळ http://mkv2.mah.nic.in किंवा www.vnmkv.ac.in या संकेतस्थळावर देण्यात आलेला आहे. उमेदवारांनी विहित नमुन्यातील परिपुर्ण अर्ज **कुलसचिव, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी- ४३१४०२ यांचे** कार्यालयात **दि.३०/६/२०१७ पर्यंत पोहचतील अशा बेताने पाठवावा** किंवा प्रत्यक्ष कार्यालयीन वेळेत सादर करावा, त्यानंतर प्राप्त होणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. पोस्टाव्दारे पाठविलेले अर्ज विलंबाने प्राप्त झाल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.

आवेदन शुल्क :

| पदाचे नाव | आवेदन शुल्क |
|---|---|
| १) वरिष्ठ संशोधन सहायक (कृषि शाखा)<br>२) वरिष्ठ संशोधन सहाय्यक (अन्नंतत्र शाखा) | अमागास/खुला प्रवर्ग रु.३००/-<br>राखीव प्रवर्ग (मागासवर्गीय प्रवर्ग) रु.१५०/- |

१. विहित केलेल्या आवेदन शुल्काचा भरणा विहित मुदतीत म्हणजे अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांक ३०/०६/२०१७ पुर्वी भरणा न केल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज रद्द केला जाईल व त्याबाबत संबंधित उमेदवारास कुठलीही पूर्वसुचना देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.
२. उमेदवारांनी आवेदन शुल्क हे **नियंत्रक,वसंतराव नाईक मराठवाठा कृषि विद्यापीठ,परभणी** यांच्या नावे स्टेट बँक ऑफ इंडिया (हैद्राबाद), शाखा मकृवि,परभणी येथे रोख स्वरुपात खाते क्रं.६२३९२५२२०५३ मध्ये भरणा करावा. सदर बॅकेच्या शाखेचा आय.एफ.एस.सी. (I.F.S.C.) कोड हा एस.बी.एच.वाय. (SBHY) ००२०३१७ असून शुल्काची रक्कम भरणा केल्याची पावती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

**किंवा**

राष्ट्रीयकृत बँकेद्वारे ऑनलाईन भरणा केला असल्यास त्याची प्रिन्ट अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.

याव्यतीरिक्त आवेदन शुल्क रोख रक्कमेत किंवा डी.डी. किंवा आय.पी.ओ. याद्वारे आवेदन शुल्क स्विकारले जाणार नाहीत. तथापि त्यामुळे आवेदन अर्ज अपात्र करण्यात येईल.